# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक ३०.०४.२०२६ गुरूवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २९.०४.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १३ केसेसमध्ये १३ ईसमावर कारवाई करून एकुण ३,१६,०२०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच, जुगार कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये ०४ ईसमावर कारवाई करून एकुण २,३५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली १,९०२ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,१९,२५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट ०२ पथकाची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक २९.०४.२०२६ चे १६.३० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा, युनिट क्र. २ चे अधिकारी व अंमलदार हे गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, गोरेवाडा रोड, वॉटर फिल्टर समोर एक ईसम एम.डी. पावडर विक्रीकरीता ग्राहकांचे शोधात दुचाकीवर बसून आहे. अशा खात्रीशीर माहितीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, प्राप्त वर्णनाचा ईसम एका होन्डा शाईन दुचाकी क्र. एम. एच. ३१ एच.एफ. ९१७६ यावर बसून दिसुन आला. त्यास ताब्यात घेवून त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव रविशंकर श्रीसियाराम यादव, वय ३३ वर्षे, रा. गोरेवाडा वस्ती, अमित सायकल स्टोअर्स मागे, गिट्टीखदान, नागपुर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची व त्याच्या ताब्यातील दुचाकीची झडती घेतली असता, त्याचे ताब्यातील दुचाकी चे डिक्कीत एका पिशवीमध्ये ७५० ग्रॅम गांजा मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन गांजा, होन्डा शाईन दुचाकी व दोन मोबाईल फोन असा एकुण ७०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीची सखोल विचारपूस केली असता, त्याने त्याचा साथिदार पाहिजे आरोपी क्र. १) आलोक नावाचा ईसम, वय अंदाजे वय २७ वर्षे, रा. काटोल रेल्वे स्टेशन जवळ, जि. नागपूर २) दिगांबर नावाचा ईसम यांचे मदतीने गांजा आणल्याचे सांगीतले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क), २०(ब)(ii)(अ),

२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. निकेतन कदम, पोलीस उप आयुक्त (अति. कार्य. डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख, सपोनि. गजानन चांभारे, सचिन मते. पोहवा. महेंद्र सडमाके, राजेश तिवारी, नापोअं. सुरेश तेलेवार, पोअं. आशिष धंदरे, सुनिल कुंवर व चापोअं. विवेक श्रीपाद यांनी केली.



**२) गुन्हेशाखा, सोनसाखळी चोरी विरोधी पथक पोलीसांची कामगिरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

मा. श्री. रविंद्रकुमार सिंघल पोलीस आयुक्त नागपुर शहर यांचे आदेशान्वये व मार्गदर्शनात संपुर्ण नागपुर शहरात मादक पदार्थ बाळगणारे व विक्री करणारे आरोपी विरोधात **"ऑपरेशन थंडर"** राबविण्यात येत आहे.

दिनांक २९.०४.२०२६ चे १६.०० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा, सोनसाखळी चोरीविरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे पारडी हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, अन्न सुरक्षा अधिकारी यांचेसह आरोपी नामे मधुकर महादेवराव मानकर, वय ६२ वर्षे, रा. प्लॉट नं. ६१२, पारडी, नागपुर याचे राहते घरी पंचासमक्ष रेड कार्यवाही केली असता, आरोपी हा त्याचे ताब्यात शासनाने प्रतीबंधीत केलेला सुगंधीत तंबाखु, पानमसाला वेगवेगळ्या कंपनीचा व फ्लेवरचे तंबाखु पाऊच विक्री करीता बाळगुन मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन रिमझीम नं. १, पानपराग, रजनीगंधा, रत्ना छाप, पान बहार, डायरेक्टर, राजश्री, विमल, व्हि १ अशा वेगवेगळ्या नावाचे व कंपनीचे सुगंधीत तंबाखु तथा पानमसाला तसेच, खर्रा मशीन असा एकुण किंमती २६,६७८/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता शासनाने प्रतिबंधीत केलेले तंबाखुजन्य पदार्थ व सुगंधीत पानमसाला बेकायदेशीर व अवैधरित्या विक्री करीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीविरूध्द फिर्यादी अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती रविना बबन नागले, वय २५ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पारडी येथे आरोपीविरूध्द कलम १२३, २२३, २७४, २७५ भा.न्या.सं. सहकलम २६(१), २६(२), ५९ अन्न सुरक्षा मानके अधिनीयम—२००६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपुर शहर, मा. श्री. निकेतन कदम, पोलीस उप आयुक्त (अति. कार्य. डिटेक्शन), मा. अभिजीत पाटील, सहा. पोलीस

आयुक्त (गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली, गुन्हेशाखा सोनसाखळी चोरीविरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**<u>४) कळमना पोलीसांची कामगिरी :— गोडावून फोडून चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

फिर्यादी नंदलाल नटवरलाल लाहोटी, वय ४५ वर्षे, रा. फ्लॅट नं. ४०५, तुलसी अपार्टमेन्ट, टेलीफोन एक्सचेंज चौक, लकडगंज, नागपुर यांचे पोलीस ठाणे कळमना हद्दीत, डिप्टी सिग्नल, रेल्वे क्रॉसिंगचे बाजूला मसाल्याचे गोडावून आहे. दिनांक २५.०४.२०२६ चे १९.०० वा. ते दिनांक २७.०४.२०२६ चे १०.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी यांनी त्यांचे गोडावूनला कुलूप लावून आपले घरी गेले होते. दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे गोडावूनचे भिंतीचे टिन काढून, आंत प्रवेश करून, कॅबीनमधील ड्रॉव्हरमध्ये ठेवलेले रोख ९,५५,०००/—रू. चोरून नेले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्ह्याचे तपासादरम्यान, कळमना पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून आणि मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपी आदित्य सुरेश डेलीकर, वय १९ वर्षे, रा. फवारा चौक, कुंभार मोहल्ला, डिप्टी सिग्नल, कळमना, नागपूर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने त्याचे ईतर दोन साथीदार विधीसंघर्षग्रस्त बालक यांचेसह वर नमुद गुन्हा संगणमताने केल्याची कबूली दिली. आरोपीस तथा विधीसंघर्षग्रस्त बालकास मुद्देमालाबाबत विचारपुस केली असता, विधीसंघर्षग्रस्त बालकांचे ताब्यातुन एकुण रोख ५,०४,९६०/—रू. आणि गुन्ह्यात वापरलेली लाल काळ्या रंगाची पॅशन प्लस दुचाकी क्र. एम.एच. ४० के. ९९९० किंमती ५०,०००/—रू. असा एकुण किंमती ५,५४,९६०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. शिवाजीराव राठोड अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. निकेतन कदम, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रविण काळे, पोउपनि. संतोषकुमार रामलोड, पोहवा. रविकुमार शाहु, प्रदिप पवार, पोअं. मंगेश लोही, संतोष पांडे, अनिल जाधव, प्रफुल गोहोकार यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे पारडी:— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २६.०४.२०२६ चे १६.०० वा. ते दिनांक २९..०४.२०२६ चे ०६.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे पारडी हद्दीत, प्लॉट नं. २४, भवानी नगर, काजल बिअर बार जवळ, नागपुर येथे राहणारे

फिर्यादी संजय भाऊलाल सुरकर, वय ४० वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह नातेवाईकाचे लग्न कार्यक्रमाकरीता एकोडी जि. भंडारा येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मागील दाराचे कुलूप तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख १०,०००/—रू., सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने तथा चांदीचे सिक्के असा एकुण किंमती १,६४,६००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पारडी येथे पोउपनि. सचिन ठाकरे ९०३१३२७४८८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**